

स्थापना: जुन १९६४

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"

- शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे



श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संस्थेचे

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

२१३० ई-वॉर्ड, ताराबाई पार्क, ता. करवीर, जिल्हा. कोल्हापूर ४१६००३

यु.जी.सी 2(f) & 12(B) मान्यताप्राप्त

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर (महाराष्ट्र) संलग्नित

संकेतस्थळ: www.vivekanandcollege.ac.in ई-मेल: info@vivekanandcollege.org

**परीक्षा विभाग**

**शैक्षणिक वर्ष 2019-20**

---

दि. 06/08/2021

## विद्यार्थ्यांसाठी महत्वाची नोटिस

कोविड–19व्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग महाराष्ट्र शासनाच्या परिपत्रकानुसार व शिवाजी विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार (शिवाजी वि./ऑन परीक्षा/47/दि. 05/08/2021) सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की मार्च 2020 या सत्राच्या परीक्षेचे निकाल **Carry forward** पद्धतीने जाहीर करण्यात आलेले आहेत अशा सर्व विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमाचे 20 टक्के परीक्षा शुल्क माफ करण्यात आले आहे. सदर रक्कम 31 ऑगस्ट, 2021 अखेर कार्यालयातून घेऊन जावी.

परीक्षा नियंत्रक
Controller of Examination
Vivekanand Autonomous College Kolhapur.

VIVEKANAND COLLEGE ESTD JUNE 1964 KOLHAPUR-416 003

प्राचार्य
Chief Controller of Examination
Vivekanand Autonomous College, Kolhapur.

Estd. 1962
"A++" Accredited by NAAC (2021) With CGPA 3.52

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## परिपत्रक

कोविड -१९ च्या पार्श्वभूमीवर विविध शुल्कामध्ये विद्यार्थ्यांना सवलत देण्यासंदर्भात उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांच्या पत्र क्र. बैठक -२०२१ / प्र. क्र. १३७ /विशि-३ दिनांक ३० जून २०२१ च्या संदर्भाने व्यवस्थापन परिषदेच्या झालेल्या ठरावास अनुसरून आदेशान्वये कळविण्यात येते की खाली नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी .

१. सन २०१९-२० मधील उन्हाळी सत्र मार्च २०२० च्या ऑक्टो / नोव्हे. २०२० मध्ये आयोजित परीक्षामध्ये carry forward पदधतीने निकाल जाहीर करण्यात आलेले आहेत अशा विद्यार्थ्यांचे अभ्यासक्रमाचे २०% परीक्षा शुल्क महाविद्यालय / अधिविभाग/ विद्यापीठामार्फत विद्यार्थ्यांना परत करावयाचे असून याबाबत प्रस्ताव पूरक कागदपत्रासह संबंधित परीक्षा विभागाकडे स्वतंत्रपणे सादर करण्यात यावेत .

२. सन २०२०-२१ या शैक्षणिक वर्षाबाबत अनुदानित महाविद्यालये व विद्यापीठ अधिविभागातील सर्व अभ्यासक्रमांसाठी आकारण्यात येणाऱ्या इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क , विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क , कॉलेज मॅगझीन शुल्क , संगणक शुल्क , क्रीडा निधी , वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे.

३. प्रयोगशाळा व ग्रंथालय यांची देखभाल व ग्रंथालयामध्ये ई - कन्टेंट विकत घेण्यासाठी खर्च करण्यात आला असल्याने याबाबतच्या शुल्कामध्ये ५० % सवलत देण्यात यावी .

४. विद्यार्थ्यांद्वारे वसतिगृहाचा उपयोग करण्यात येत नसल्याने वसतिगृह शुल्कापोटी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे .

५. विनाअनुदानित / कायम विनाअनुदानित महाविद्यालयांत देखील इतर शुल्कांमधील जिमखाना शुल्क , विविध गुणदर्शन / उपक्रम शुल्क , कॉलेज मॅगझीन शुल्क , संगणक शुल्क , क्रीडा निधी , वैद्यकीय मदत निधी आणि युथ फेस्टिवल अशा ज्या बाबींवर कोणत्याही प्रकारे खर्च करण्यात आलेला नाही त्या बाबींसाठी आकारण्यात येणारे शुल्क पूर्णपणे माफ करण्यात यावे. त्याचप्रमाणे प्रयोगशाळा व ग्रंथालय शुल्क यामध्ये ५० % सवलत देण्यात यावी .

६. शैक्षणिक वर्ष २०२१ - २२ मध्ये जे विद्यार्थी पुढील वर्गात प्रवेशित होणार आहेत त्यांचे परत करावयाचे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्काचे उपरोक्त अ. क्र. २,३,४ व ५ मध्ये नमूद केले प्रमाणे समायोजन करण्यात यावे.

७. जे विद्यार्थी शैक्षणिक वर्ष २०२० - २१ मध्ये पदवी , पदव्युत्तर अंतिम वर्ष , अंतिम सत्र परीक्षा उत्तीर्ण झाले आहेत त्यांचे देय ठरणारे परीक्षा व शैक्षणिक शुल्क वगळून इतर शुल्क परत करण्यात यावे

८. विद्यार्थ्यांकडे प्रलंबित असलेले शुल्क ३ ते ४ हप्त्यात भरण्याची सवलत देण्यात यावी, तसेच शुल्क थकीत असेल तर परीक्षेचा अर्ज करण्यास अडवू नये, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होणार नाही, याची दक्षता घेण्यात यावी.

कुलसचिव

जा.क्र.शिवाजी वि./ऑन परीक्षा/४८
दिनांक 05/08/2021

प्रत -

१) मा . विभागप्रमुख /संचालक /समन्वयक ,पदवी व पदव्युत्तर अधिविभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .
२) मा . प्राचार्य / संचालक. सर्व संलग्नीत महाविद्यालये .
३) मा . संचालक , दूर शिक्षण केंद्र , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .
४) सर्व उपकुलसचिव , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .
५) वित्त व लेखा विभाग , शिवाजी विद्यापीठ , कोल्हापूर .